| | राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान<br>सार्वजनिक आरोग्य विभाग, नाशिक महानगरपालिका<br>कंत्राटी पद भरती प्रक्रिया<br>जाहीरात क्र.०१/२४ | |
|---|---|---|

राष्ट्रिय नागरी आरोग्य अभियानांतर्गत नाशिक महानगरपालिकासाठी भरती प्रक्रिया कंत्राटी व करार पध्दतीने मानधन तत्वावर खालील पदांसाठी पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

| Sr. No. | Name of Post | No. of Post & applicable reservation | Educational Qualification | Age Criteria | Remuneration in per Month |
|---|---|---|---|---|---|
| 1 | FULL TIME MEDICAL OFFICER | 106- SC-11,ST-23,VJ (A)-3,NT(B)-3, NT C-4,NT D-2 ,SBC-2,OBC-16,EWS-11, OPEN-31 | MBBS FROM INSTITUTE RECOGNIZED BY MEDICAL COUNCIL OF INDIA | Maximum Age limit up to 70 years. After attending age of 60 candidate has to provide fitness certificate issued by Civil Surgeon. | Rs.60000/- |
| | | | BAMS FROM INSTITUTE RECOGNIZED BY MAHARASTRA MEDICAL COUNCIL OF INDIA | for Reserved category age limit up to 43 years as on<br>for open candidates age limit up to 38 years as on<br>(Candidate working in NHM age relaxation up to 5 years.) | Rs 25000/- fixed Salary & Rs 15000/- Performance Incentive |

सदर पदे नाशिक महानगरपालिका नाशिक अंतर्गत कार्यान्वित करण्यात येणा या "आयुष्यमान आरोग्यं मंदिर " केंद्र करीता आहेत.

**<u>अटी व शर्ती:-</u>**

1) 15 वा वित्त आयोग अंतर्गत "आयुष्यमान आरोग्यं मंदिर " केंद्रातील वैदयकिय अधिकारी म्हणुन MBBS पदवीधारकांच्या नियुक्तिला प्राधान्य देण्यासाठी केंद्र शासनाने सुचविले आहे. त्यानुसार "आयुष्यमान आरोग्यं मंदिर " केंद्रातील वैदयकिय अधिकारी पदाकरीता MBBS पदवीधारकांची नियुक्ति करणेकरीता प्राधान्य देण्यात येईल. परंतु अनेक प्रयत्न करुनही MBBS पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास, 15 वा वित्त आयोग अंतर्गत "आयुष्यमान आरोग्यं मंदिर " केंद्राकरीता वैदयकिय अधिकारी म्हणुन MBBS पदवीधारक उमेदवार उपलब्ध होईपर्यत अथवा 6 महिन्याकरीता BAMS पदवीधारक उमेदवारास वैदयकिय अधिकारी म्हणुन तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ति देण्यात येईल.
2) वरील सर्व पदे अत्यंत कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असुन दि. 29-06-2024 रोजी पर्यंतच्या कालावधीसाठी भरण्यात येणार आहेत. पुढील पुर्ननियुक्ती (११ महिने २९ दिवसाच्या कालावधीकरीता) आपल्या कामगिरी मुल्यांकनावर आधारीत असेल.शासनाने सदर पदे नामंजुर केल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता उमेदवारांची सेवा संपुष्टात येईल.
3) पदासमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असुन त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.
4) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द् कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.
5) वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकीय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही. तसेच यापदासाठी शासनाचे सेवा नियम लागू नाहीत.सदर पदावर कायमचा हक्क राहणार नाही तसेच या पदासाठी अर्जदाराला शासकिय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबधि दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.
6) जाहिरातीतील रिक्त पदाच्या संख्येत बदल होऊ शकतो तसेच रिक्त ठिकाणांमध्ये बदल होऊ शकतो. याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त तथा प्रशासक, नाशिक महानगरपालिका यांनी राखुन ठवले आहेत.
7) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिला जाईल.
8) निवड यादीतील गुणक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रम पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवारांनी कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात होईल.
9) जाहिरीतीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वय खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्गीय करीता ४३ वर्षे राहील.NHM मध्ये कार्यरत असल्यास वयोमर्यादा हि 5 वर्ष शिथील राहील. वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.) यांची सेवा प्रवेश आणि सेवा समाप्तीची वयोमर्यादा ७० वर्ष राहील. ६० वर्षावरील अर्जदारांकरीता जिल्हा शल्य चिकित्सक प्रमाणित शारिरीक योग्यता (Physical Fitness) चे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. वय वर्ष ६० नंतर प्रत्येक वर्षी जिल्हा

शल्य चिकित्सक यांचेकडुन शारीरीकदृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतरच नियुक्ति आदेश देण्यात येईल.

10) वैदयकिय अधिकारी या पदाकरीता शासकिय सेवेतुन सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्ती वैदयकिय अधिकारी या पदाकरीता अर्ज करीत असल्यास शासकिय सेवेत रुजु झालेला दिनांक, कार्यकाळ, पदनाम व निवृत्त झालेले वर्ष, सेवा निवृत्तीच्या दिनांकास मिळालेले अंतिम वेतन व सेवा निवृत्ती नंतर देय असलेले वेतन (पेन्शन) याबाबतची संपुर्ण माहिती अर्जामध्ये नमुद करावी.

11) शासकीय कर्मचारी यांच्या पुर्वीच्या शासकीय कर्मचारी कार्यकाळात कुठल्याही प्रकारचे गंभीर गुन्हयाची नोंद नसावी किंवा झालेली नसावी. सेवा निवृत्त यांचे निवड झाल्यास सदर पदांकरीता मानधन राज्यस्तरीय विविध मार्गदर्शक सुचनानुसार मोजमाप करून अदा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

12) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

13) उपरोक्त सर्व पदांकरीता तत्सम कौंसिल रजिष्ट्रेशनचे प्रमाणपत्र, नुतनीकरण व वैधता तारीख दर्शविणारे आय.डी. जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारांस अपात्र ठरविले जाईल.

14) भरती प्रक्रियेचे संपूर्ण अधिकार, पदे कमी-जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे, पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करणे, इत्यादी सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असून निवड प्रकियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त, नाशिक महानगरपालिका नाशिक यांनी राखुन ठेवलेले आहेत.याबाबत कोणालाही दावा करता येणार नाही.

15) इच्छुक उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्राच्या छायांकित सत्य प्रतिसह उदा. वयाचा पुरावा, पदवी / पदविका प्रमाणपत्र (सर्व वर्षांचे प्रमाणपत्र ) , गुणपत्रिका , शासकीय /निमशासकीय/खाजगी संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र कागदपत्रे कार्यालय प्रमुखाच्या स्वाक्षरी तथा नाव व मोबाईल क्र.सह जोडण्यात यावे. , अनुभव संबंधित कामाचा असावा , जात / वैधता प्रमाणपत्र इ. छायांकित प्रतींसह दि. 03/01/2024 ते 11/01/2024 (शासकिय सुटटी वगळता )या कालावधीत सकाळी 11 ते सायं. 5 वाजेपर्यंत राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, सार्वजनिक आरोग्य विभाग,राजीव गांधी भवन,नाशिक महानगरपालिका, नाशिक येथे अर्ज स्वीकारले जातील.

16) खुल्या प्रवर्गातील पदाकरीता रु.१५०/- व राखिव प्रवर्गातील पदाकरीता रु.१००/- चा डिमांड ड्राफ्ट जोडणे आवश्यक आहे व डिमांड ड्राफट च्या मागे स्वतःचे नाव स्वहस्ताक्षरात लिहावे, सदरचा डिमांड ड्राफट " **NASHIK MUNICIPAL CORPORATION INTEGRETED HEALTH & FAMILY WELFARE SOCIETY** " या नावे असावा. कोणत्याही कारणास्तव डिमांड ड्राफट बँकेत न वठल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

17) सदरहु पदभरती करीता अर्ज छाननी, निवडयादी प्रसिध्द करणे, हरकती/आक्षेप प्राप्त करुन घेणे व त्या निकाली काढणे आदि रितसर शासनाच्या तसेच राष्ट्रिय आरोग्य अभियानाकडील प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार भरती प्रक्रिया पार पाडुन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ति आदेश देणे इ. बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी www.nmc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांना वैयक्तिक स्वरुपात कळविण्यात येणार नाही.उमेदवारांनी वेळोवेळी भरतीप्रक्रियेची माहिती ही वर नमुद संकेत स्थळावर तपासावे. उमेदवारांनी वैयक्तिक स्वरुपात या कार्यालयात चौकशी करण्यास येऊ नये.

18) सदर अर्ज स्विकारला म्हणजे नोकरीसाठी निवड झाली असे नाही. सदर निवड प्रक्रिया हि नव्याने सुरु होत असलेल्या 15 वा वित्त आयोग अंतर्गत “आयुष्यमान आरोग्यं मंदिर “ केंद्राकरीता असुन केंद्रांची डागडुजी, देखभाल दुरुस्ती बांधकाम विभागामार्फत पुर्ण होऊन सार्वजनिक आरोग्यं विभागास हस्तांतरण झाल्यानंतर निवड यादीतील गुणक्रमाने नियुक्ति आदेश देण्यात येतील.

19) सदर निवड प्रक्रिया पुर्ण झालेनंतर भविष्यात जर एखादया ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस प्रतिक्षा यादीवरील उमेदवारास नविन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील.

20) लहान कुटुंबाची अट दि. २३/०७/२०२० पासून लागु करण्यात आली असून दि. २३/०७/२०२० पासून दोनपेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरतीसाठी अर्ज करण्यास पात्र ठरणार नाहीत.

21) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांच्या सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचूक नोंदवावा. तसेच ते भरतीप्रक्रिया पुर्ण होईपर्यंत व भरतीप्रक्रिया निकाल जाहिर झाल्यांच्या दिनांकापासुन ते 1 वर्षापर्यंत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.

22) अर्जाचा नमुना हा जाहिरातीसोबत प्रसिध्द करण्यात आलेला असून सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास उमेदवारांचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

23) उमेदवारांचा अर्ज अपूर्ण व अर्धवट भरलेला असल्याने नाकारला गेल्यास सर्वस्वी जबाबदारी ही उमेदवारांची राहील याबाबत उमेदवारांना तक्रार करता येणार नाही.

24) निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजू होताना सादर करावा लागेल.

25) निवड झालेल्या उमेदवारांना कार्यरत/ नव्याने कार्यान्वित होणाया "आयुष्यमान आरोग्यं मंदिर " केंद्र प्रमाणे नियुक्ती आदेश देण्यात येतील. नियुक्ति आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांमध्ये नियुक्तीचे ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपुष्टात आणून, प्रतिक्षायादीतील पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल.

sd/-
अध्यक्ष,
आयुक्त
नाशिक महानगरपालिका नाशिक

**15th FINANCE COMMISSION CONTRACTUAL RECRUITMENT**
**NASHIK MUNICIPAL CORPORATION, NASHIK**
**Year 2023-24 (Advertisement No.01/2024 )**

APPLICATION FORM

STICK RECENT PHOTO HERE

**Applying Post Name :-**_________________________________________

(All fields in the forms are mandatory to be filled an Incomplete form submitted will be treated asrejected)

<table>
<tr><td colspan="3">Name:</td></tr>
<tr><td colspan="3">Father's/Husband's Name:</td></tr>
<tr><td>Date of Birth:<br><table><tr><th>DD</th><th>MM</th><th>YYYY</th></tr><tr><td></td><td></td><td></td></tr></table></td><td>Blood Group:</td><td>Gender:<br><br>Marital status :</td></tr>
<tr><td>Age :</td><td>Existing NHM Employee (Yes/ No)</td><td>Nationality:</td></tr>
<tr><td>Original Category :</td><td>Applying Category :</td><td>Caste Certificate Attached : Yes/No</td></tr>
</table>

**Address/Contact Details: (Name of the District and Pin code is compulsory)**

| |
|---|
| Address:<br><br>State<br><br>Pin:<br><br>Contact No: |
| E-Mail Id Correspondence: |

Academic /Professional Educational all summary: (Starting form most recent)

| From (MM/YY) | TO (MM/YY) | Degree/ Diploma | University/ Institute | Specialization/ Subjects | Final Year Total Marks & Obtained Marks | Final Year Percentage ( %) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**(OFFICE USE ONLY)**

**Remark :-**______________________________________________

**Name of Authority:-**____________________**Signature of Authority:-**____________________

**Work/Experience Summary :( Starting form current/most recent)**

**Experience :**

| **Sr. No** | **Form (MM/YY)** | **To (MM/YY** | **Organization** | **Designation** | **Responsibilities (Min.30 & Max.50 Words)** |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| **Total Experience** (In Years & Months): | | | Relevant Experience to the post applied (In Years & Months): | | |
| **Computer Proficiency**: | | | | | |
| **Demand Draft No.:** **Demand Draft Amount :** | | | **Date:- / /** | **Bank Name :** | |

**Declaration**:

I hereby declare that all statements made in the application are true, Complete and correct to the best of my knowledge and belief. I understand that in the event of any information being found untrue/false/incorrect or I do satisfy the eligibility criteria my candidature will be cancelled, without assigning any reason thereof. I have read the content of the advertisement and agree to abide by the rules, regulations and procedures for appointment to the post applied for.

Name:

Place:

Date : **Signature**

Disclaimer:
The applicants are required to submit the full filled application on the day of walk in Interview

<u>**Checklist for documents to be submitted :**</u>

1) Full filled Application form in the prescribed format.
2) Valid Demand Draft as per applying category.
3) For age Proof – School Leaving Certificate/ 10th Passing Certificate / Domicile Certificate
4) Degree certificate - all years Mark sheets.
5) If any Post-graduation degree certificate, valid registration- all years Mark sheets.
6) Valid Permanent Registration, renewal with dates.
7) Experience – Experience certificate as per mention in the form

## प्रतिज्ञापन

## नमुना अ

मी श्री./श्रीमती/कुमारी ...............................................................

श्री.......................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी

वय....... वर्ष, राहणार,...................................................................

याद्वारे असे जाहिर करतो/करते की,

(१) मी .............................................. या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ...............(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै, २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............. आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

(३) दिनाक २३ जुलै, २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै, २०२० व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण:-

सही/-

दिनांक:-




To get the latest jobs alert on your mobile

Please Join our WhatsApp group